Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
।रविवार, दि. १० मे २०२६। वर्ष १ ।अंक ३५ ।पाने २।
DIGITAL EDITION

विनोद सोळंकी यांना मानद डॉक्टरेट
(पान २ वर)



## Selected

### कल्याण-डोंबिवलीत उष्णतेचा कहर

**कल्याण :** मे महिन्याच्या सुरुवातीलाच कल्याण-डोंबिवलीसह मुंबई महानगर क्षेत्र आणि कोकण पट्ट्यात उष्णतेने अक्षरशः कहर माजवला आहे. अनेक शहरांतील तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडल्याने नागरिक हैराण झाले आहेत. हवामान अभ्यासक अभिजित मोडक यांनी दिलेल्या माहितीनुसार, अंतर्गत कोकण भागात 'हीटवेव्ह' अर्थात उष्णतेच्या लाटेसदृश परिस्थिती निर्माण होऊ लागली असून येत्या काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे समुद्राकडून येणारे दमट वारे आणि वाढती आर्द्रता यामुळे प्रत्यक्ष जाणवणारे तापमान ५० ते ५५ अंश सेल्सिअसपर्यंत जाणवू शकते, असा इशाराही मोडक यांनी दिला आहे. कर्जत आणि नेरळमध्ये उच्चांक आज नोंदविण्यात आलेल्या तापमानात कर्जत येथे सर्वाधिक ४२.६°C तापमानाची नोंद झाली.

## पुढील आठवड्यात मुसळधार पावसाचा इशारा

# महाराष्ट्र दुहेरी कचाट्यात!

### सोसाट्याचा वारा आणि गारपिटीची शक्यता

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्यात हवामानाचा दुहेरी तडाखा पाहायला मिळत असून पुढील आठवड्यात १४ मे ते २० मे दरम्यान मुसळधार पाऊस, वेगवान वारे आणि गारपिटीचा धोका निर्माण झाला आहे. मान्सूनपूर्व पावसाने राज्यातील अनेक भागांना झोडपून काढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.**

त्यामुळे शेतकरी, नागरिक आणि प्रशासन सतर्क झाले आहे. गेल्या काही दिवसांत राज्यातील विविध भागांत अचानक ढगांची गर्दी, धुळीचे लोट, वीजांचा कडकडाट आणि अवकाळी पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी जोरदार वाऱ्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार पुढील काही दिवसांत या स्थितीत आणखी तीव्रता येण्याची शक्यता आहे. कोकण विभागातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत उष्ण व दमट हवामान कायम राहण्याची



#### मराठवाडा,मध्य महाराष्ट्रात गारपिटीचा इशारा

हवामान विभागाने धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांतील काही भागांत गारपिटीचा अंदाज व्यक्त केला आहे. तसेच नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

शक्यता आहे. काही भागांत उष्ण वारे वाहतील, तर सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे. चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि यवतमाळ जिल्ह्यांत वेगवान वाऱ्यासह मेघगर्जना आणि मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. काही ठिकाणी विजांचा कडकडाट होण्याचीही शक्यता आहे. सोलापूरसह मध्य महाराष्ट्रात जोरदार वारे, वीजांचा कडकडाट आणि काही भागांत गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातही हलक्या पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. रत्नागिरीत धुळीचे वादळ रत्नागिरी जिल्ह्यात सायंकाळच्या सुमारास अचानक धुळीचे वादळ आल्याने नागरिकांची तारांबळ उडाली.

**जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी**

## "हेल्मेट कुठे आहे?"

### सचिनचा बाईकस्वार तरुणाला प्रश्न

। जन सम्राट टाईम्स ।



**पुणे | प्रतिनिधी :** पुण्यातील ट्रॅफिकमध्ये एका सामान्य दुचाकीस्वाराला आलेला अनुभव सध्या सोशल मीडियावर आणि माध्यम वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. पुण्यातील रस्त्यावरून सोहम मार्गजे नावाचा तरुण आपल्या दुचाकीवरून जात असताना, एका सिग्नलला त्याच्या बाजूला एक आलिशान रेंज रोव्हर कार येऊन थांबली. अचानक त्या गाडीची काच खाली झाली आणि आतून खुद्द क्रिकेटचा देव मानल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकर यांनी सोहमला "हेल्मेट कुठे आहे?" असा थेट सवाल केला. हा प्रसंग सोहमसाठी जेवढा थक्क करणारा होता,सचिन तेंडुलकर हे केवळ क्रिकेटमधील विक्रमांसाठीच नाही, तर त्यांच्या सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेसाठीही ओळखले जातात. या घटनेतही त्यांनी केवळ एक सेलिब्रिटी म्हणून न वागता, एका सजग नागरिकाच्या भूमिकेतून तरुणाला सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. सचिनने सोहमला आवर्जून सांगितले की, "दुचाकी चालवताना सुरक्षेसाठी हेल्मेट वापरणे अत्यंत आवश्यक आहेखेळाडूने स्वतःहून गाडीची काच खाली करून दिलेला हा सल्ला सोहमच्या कायमचा स्मरणात राहणारा ठरला असून, त्याने यापुढे हेल्मेट वापरण्याची ग्वाही दिली आहे. सचिन तेंडुलकर यांचा हा व्हिडिओ आणि त्यामागची कहाणी इंटरनेटवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे.

**जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज**

## भूसंपादन घोटाळ्याप्रकरणी बीडचे अविनाश पाठक अटकेत

### महसूल विभागात खळबळ

जन सम्राट टाईम्स

**बीड | प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन आणि मावेजा वाटपातील बहुचर्चित ७३ कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी मोठी कारवाई करत विशेष तपास पथकाने (SIT) बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना लातूर येथून अटक केली आहे. या कारवाईमुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली असून या प्रकरणाचे धागेदोरे आणखी कोणापर्यंत पोहोचतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. या अटकेच्या वृत्ताला नवनीत कांवत यांनी दुजोरा दिला आहे. एसआयटीने दिवसभर अविनाश पाठक यांची कसून चौकशी केली. चौकशीत समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने अखेर त्यांना ताब्यात घेण्यात आले. बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. जमिनीचा वाढीव मावेजा मंजूर करून देण्यासाठी बनावट आदेश काढण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. माहितीनुसार, अविनाश पाठक यांची २२ एप्रिल २०२५ रोजी बीड येथून बदली झाली होती. मात्र,



बदलीनंतरही त्यांच्या कार्यकाळातील जुन्या तारखा वापरून आणि बनावट स्वाक्षऱ्या करून वाढीव मोबदल्याचे आदेश जारी करण्यात आले.

#### नोंदीशिवाय मंजूर आदेश

या बनावट आदेशांच्या आधारे तब्बल १५४ प्रकरणांमध्ये २४१ कोटी ६२ लाख रुपयांचा वाढीव मोबदला मंजूर करण्यात आला. यापैकी ७३ कोटी ४ लाख रुपये संबंधित खातेदारांना वितरितही करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तपासादरम्यान आणखी एक गंभीर बाब उघडकीस आली आहे. भूसंपादन समन्वय कार्यालयाने या वाढीव मोबदल्याच्या आदेशांची कोणतीही अधिकृत नोंद रजिस्टर किंवा नोंदवहीत ठेवली नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेवर संशय अधिक गडद झाला आहे.

## एलपीजी गॅस सिलेंडर वितरणातील 'ओटीपी' अट शिथिल करा : उच्च न्यायालय

जन सम्राट टाईम्स

**नागपूर | प्रतिनिधी :** एलपीजी गॅस सिलेंडरच्या वितरणासाठी सक्तीची करण्यात आलेली 'ओटीपी' अट शिथिल करण्याबाबत केंद्र सरकारने तातडीने पावले उचलावीत, असे महत्त्वपूर्ण निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहेत. गॅस वितरणातील तांत्रिक अडचणी आणि ग्राहकांना होणारा त्रास लक्षात घेऊन न्यायालयाने केंद्र सरकारला या प्रकरणी आगामी तीन आठवड्यांच्या आत योग्य तो निर्णय घेण्यास सांगितले आहे. गॅस वितरक संघटनेने या समस्येविरोधात न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली होती. डिजिटल बुकिंग आणि सक्तीच्या ओटीपी प्रणालीमुळे ग्राहकांची तसेच पर्यायाने वितरकांचीही मोठी गैरसोय होत आहे.

अनेकदा तांत्रिक अडचणींमुळे ग्राहकांना वेळेवर ओटीपी मिळत नाही, ज्यामुळे सिलेंडर डिलिव्हरीच्या प्रक्रियेत गंभीर अडथळे निर्माण होतात आणि दैनंदिन वितरण यंत्रणेवर नाहक ताण येतो, असे वितरकांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. या याचिकेवर सुनावणी करताना नागपूर खंडपीठाने वितरक आणि सामान्य ग्राहकांना भेडसावणाऱ्या या व्यावहारिक अडचणींची गंभीर दखल घेतली. तंत्रज्ञानाचा वापर हा प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी असला पाहिजे, तो अडथळा ठरू नये, या अनुषंगाने न्यायालयाने संबंधित यंत्रणांना खडेबोल सुनावले.

## सवाणे यांना 'भारत की बेटी' पुरस्कार

जन सम्राट टाईम्स

शेती व्यवसायात प्रामाणिकपणे आणि कष्टपूर्वक कार्य करत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गौतमी लक्ष्मण सवाणे यांना MEDIA WORLD NEWS यांच्या वतीने २०२६ सालचा प्रतिष्ठेचा 'भारत की बेटी' पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन प्रदान करण्यात आला. शेती क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आणि महिलांसाठी प्रेरणादायी



ठरणाऱ्या योगदानाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन सुमित आंबेकर यांनी केले होते. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. मान्यवरांची उपस्थिती यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अंकिता पाटील ठाकरे, देव गिल, प्रसाद शिखरे, केसरी, एस. एस. सावंत, प्रमोद गोळे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष चे पुणे शहर उपाध्यक्ष आनंद सवाणे उपस्थित होते. महिलांसाठी प्रेरणादायी कार्य ग्रामीण भागात शेती व्यवसाय सांभाळत मेहनतीच्या जोरावर यश संपादन करणाऱ्या गौतमी सवाणे यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या सन्मानामुळे महिलांमध्ये शेती आणि उद्योजकतेबाबत सकारात्मक प्रेरणा निर्माण होईल, अशी भावना कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली.

## सुवेंदू अधिकारी यांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

### पश्चिम बंगाल राज्यात पहिल्यांदाच भाजप सरकार!


जन सम्राट टाईम्स

**पश्चिम बंगाल :** पश्चिम बंगालच्या राजकारणात एक मोठी उलथापालथ पाहायला मिळाली. भारतीय जनता पक्षाचे नेते सुवेंदू अधिकारी यांनी शनिवारी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. कोलकाता येथील ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राउंडवर आयोजित एका भव्य सोहळ्यात राज्यपाल आर.एन. रवी यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. स्वातंत्र्यानंतर बंगालमध्ये पहिल्यांदाच भाजपचे सरकार स्थापन झाले असून, यासोबतच गेल्या १५ वर्षांपासून सुरू असलेल्या तृणमूल काँग्रेसच्या सत्तेचा अंत झाला आहे.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः उपस्थित होते. त्यांच्यासोबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि एनडीए शासित राज्यांचे अनेक मुख्यमंत्री व दिग्गज नेते व्यासपीठावर उपस्थित होते. हा विजय म्हणजे 'जनशक्तीचा' विजय असल्याचे पंतप्रधान मोदींनी यावेळी नमूद केले.

ऐतिहासिक क्षण:

सुवेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली, तर त्यांच्यासोबत दिलीप घोष, अग्निमित्र पॉल, अशोक कीर्तनिया, खुदिराम टुडू आणि निशीथ



प्रामाणिक या ५ दिग्गज नेत्यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली.

* विशेष योगायोग: शनिवारी गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती (पोचिशे बोईशाख) आहे. या शुभ मुहूर्तावर शपथविधी होणे हा एक सुखद योगायोग असल्याचे पंतप्रधानांनी म्हटले.

* भावूक क्षण: पंतप्रधान मोदींनी ९८ वर्षीय ज्येष्ठ भाजप कार्यकर्ते माखनलाल सरकार यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. माखनलाल यांनी १९५२ मध्ये श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासोबत काश्मीर आंदोलनात सहभाग घेतला होता.

* भव्य सोहळा: ब्रिगेड परेड ग्राउंडवर लाखो समर्थकांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला, जो बंगालमधील बदलत्या राजकीय वाऱ्यांचे प्रतीक ठरला. सध्या ५ मंत्र्यांनी शपथ घेतली असून लवकरच मंत्रिमंडळाचा विस्तार केला जाणार आहे. सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील हे नवीन सरकार बंगालच्या विकास आणि प्रशासकीय सुधारणांवर भर देणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## इनडोअर स्टेडियम'मध्ये विजय यांच्या शपथविधी

### देशातील दिग्गज नेते उपस्थित राहणार

जन सम्राट टाईम्स

**चेन्नई | प्रतिनिधी :** तमिळनाडूच्या राजकारणात एक ऐतिहासिक क्रांती घडत आहे. अभिनेता विजय यांच्या नेतृत्वाखालील 'तमिझगा वेत्री कळघम' (टीव्हीके) पक्षाने सत्तेसाठी आवश्यक असलेले पाठबळ मिळवले आहे. बहुमताचा ११८ हा आकडा गाठण्यासाठी आवश्यक असलेले समर्थन मित्रपक्षांकडून मिळाल्याने, आता विजय तामिळनाडूचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्यास सज्ज झाले आहेत. सरकार स्थापनेसाठी 'विदुथलाई चिरुथाईगल काची' (व्हीसीके) या पक्षाने आपली अधिकृत पाठिंब्याची पत्रे सादर केल्याने विजय यांचा सत्तेचा मार्ग मोकळा झाला आहे.

याव्यतिरिक्त काँग्रेस (५ जागा), सीपीआय (२ जागा) आणि सीपीआय (एम) (२ जागा) यांनीही विजय यांना पाठिंबा जाहीर केला आहे. या राजकीय जुळवाजुळवीमुळे तामिळनाडूच्या राजकारणात गेल्या ६० वर्षांपासून असलेली द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोन द्राविडी पक्षांची मक्तेदारी संपुष्टात आली असून एका नवीन राजकीय पर्वाची सुरुवात झाली आहे.

चेन्नईतील 'जवाहरलाल



नेहरू इनडोअर स्टेडियम'मध्ये हा भव्य शपथविधी सोहळा पार पडणार असून राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर हे विजय यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. या सोहळ्यासाठी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह देशातील अनेक दिग्गज नेते उपस्थित राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विजय यांनी नुकतीच राजभवनावर राज्यपालांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा केला होता, आंबेडकर, पेरियार आणि कामराज यांच्या विचारधारेवर आधारित पक्ष अभिनेता ते राजकारणी असा प्रवास करणाऱ्या विजय यांनी आपल्या पहिल्याच निवडणुकीत प्रस्थापित राजकीय गणितांना धोबीपछाड देत हे यश मिळवले आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार आणि कामराज' यांच्या विचारधारेवर आधारित असलेल्या टीव्हीके पक्षाने तरुणांच्या आणि महिलांच्या पाठिंब्यावर सुमारे ३४.९२% मते मिळवली आहेत.

#### दोन द्राविडी पक्षांची मक्तेदारी संपुष्टात

या राजकीय जुळवाजुळवीमुळे तामिळनाडूच्या राजकारणात गेल्या ६० वर्षांपासून असलेली द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोन द्राविडी पक्षांची मक्तेदारी संपुष्टात आली असून एका नवीन राजकीय पर्वाची सुरुवात झाली आहे. चेन्नईतील 'जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियम'मध्ये हा भव्य शपथविधी सोहळा पार पडणार असून राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर हे विजय यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. या सोहळ्यासाठी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह देशातील अनेक दिग्गज नेते उपस्थित राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज**

## तंत्रज्ञानाने गतिमान केली मुंबई-पुणे, नाशकातील सार्वजनिक वाहतूक

### 'इंटेलिजेंट ट्रान्सपोर्ट सिस्टीम'ने बदलली देशातील सरकारी वाहतूक व्यवस्था

विक्रांत पाटील
जन सम्राट टाईम्स

**पुणे/नाशिक :** बस स्टॉपवर तासन्तास उभे राहून 'बस कधी येणार?' याची वैतागून वाट पाहण्याची वेळ कधीच इतिहासजमा झाली आहे. आज तुम्ही तुमच्या मोबाईलवर बसचे लाईव्ह लोकेशन पाहू शकता, बसमध्ये स्वयंचलित तिकीट मिळते आणि प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे सज्ज असतात. पुणे (पीएमपीएमएल), नाशिक (सिटी लिंक) आणि मुंबई (बेस्ट) च्या सार्वजनिक वाहतुकीत आलेला हा सुखद आणि आधुनिक बदल कोणत्याही परदेशी तंत्रज्ञानाचा भाग नसून, यामागे आहे पुण्याच्या 'केपीआयटी टेक्नॉलॉजीज'चे 'इंटेलिजेंट ट्रान्सपोर्ट सिस्टीम' (आयटीएस) हे स्वदेशी तंत्रज्ञान! नुकतेच काळाच्या पडद्याआड गेलेले केपीआयटीचे सह-संस्थापक डॉ. रवी पंडित यांच्या 'तंत्रज्ञान सर्वसामान्यांसाठी' या दृष्टिकोनातूनच या स्मार्ट ट्रान्सपोर्टची मुहूर्तमेढ रोवली गेली. केपीआयटीचे 'इंटेलिजेंट ट्रान्सपोर्ट सिस्टीम' (आयटीएस) म्हणजे सार्वजनिक वाहतुकीचा संपूर्ण कायापालट करणारी एक एकात्मिक (इंटीग्रेटेड) इलेक्ट्रॉनिक प्रणाली आहे. बस आणि प्रशासनाचे कंट्रोल रूम यांना जोडणारा हा एक तांत्रिक दुवा आहे.

यात प्रामुख्याने खालील गोष्टींचा समावेश असतोया तंत्रज्ञानामुळे केवळ प्रवाशांचाच वेळ वाचतो असे नाही, तर प्रशासकीय पातळीवर मोठी गती येते. शहराच्या 'सेंट्रल कमांड सेंटर'मधून शेकडो बसेसवर एकाच वेळी 'लाईव्ह' लक्ष ठेवले जाते. एखाद्या मार्गावर जास्त गर्दी



असल्यास किंवा बस वेळेमागे असल्यास तिथूनच तात्काळ जादा बस सोडण्याचे आदेश दिले जातात. ट्रॅफिकमध्ये बस अडकल्यास चालकाला पर्यायी मार्ग सुचवणे आणि दोन बसेस एकाच वेळी एकाच मार्गावर जाण्यापासून (बंचिंग) रोखणे आता शक्य झाले आहे. सर्व्हरवर डेटा जमा होत असल्याने कोणत्या मार्गावर कोणत्या वेळी किती प्रवासी असतात, याचे विश्लेषण करून बसच्या फेऱ्यांचे अचूक नियोजन केले जाते. यामुळे इंधनाची मोठी बचत होते आणि विनातिकीट प्रवासालाही आळा बसून वाहतूक संस्थांच्या महसुलात वाढ होते.पुण्याची पीएमपीएमएल, नाशिकची सिटीलिंक आणि मुंबईची बेस्ट या महाराष्ट्रातील प्रमुख वाहतूक व्यवस्था 'केपीआयटी'च्या तंत्रज्ञानाने स्मार्ट झाल्या आहेतच; पण कंपनीची भरारी याहून खूप मोठी आहे. आज भारतातील १९ पेक्षा जास्त राज्यांमधील ४,००० हून अधिक बसेसमध्ये हे तंत्रज्ञान वापरले जात आहे. यामध्ये कोलकाता (डब्ल्योबीटीसी), सुरत, अहमदाबादचा बीआरटीएस प्रकल्प, इंदूर आणि नागपूरसारख्या प्रमुख स्मार्ट शहरांचा समावेश आहे. भारत सरकारच्या 'अर्बन बस स्पेसिफिकेशन' (युबीएस-टू) अंतर्गत प्रमाणित झालेले केपीआयटी हे भारतातील पहिले 'ऑन-बस आयटीएस' असून, भारतीय बाजारात त्यांचा वाटा ९० टक्क्यांहून अधिक राहिला आहे.

*** लाईव्ह ट्रॅकिंग (जीपीएस - एएलव्हीसी):**
* प्रत्येक बसमध्ये बसवलेल्या अचूक जीपीएसमुळे बस सध्या कुठे आहे, तिचा वेग किती आहे आणि ती स्टॉपवर किती वेळात पोहोचेल, याची माहिती मिळते.

*** प्रवासी माहिती प्रणाली (पीआयएस):**
* बस स्टॉपवर आणि बसच्या आत लावलेल्या एलईडी स्क्रीनवर येणाऱ्या बसची माहिती, पुढील स्टॉप आणि वेळेची स्वयंचलित घोषणा केली जाते.

*** स्मार्ट तिकीट आणि सुरक्षा:**
* स्वयंचलित ई-तिकीट प्रणालीमुळे (ईटीएम) व्यवहार पारदर्शक झाले आहेत. तसेच, बसमधील सीसीटीव्ही कॅमेरे आणि 'पॅनिक बटण' थेट मुख्य नियंत्रण कक्षाला (कंट्रोल रूम) जोडलेले असल्याने आपत्कालीन स्थितीत तात्काळ मदत मिळते.

*** वाहन आरोग्य संनियंत्रण (व्हेहिकल डायग्नोस्टिक्स):**
* बसच्या इंजिनमध्ये किंवा सुट्या भागांत बिघाड होणार असेल, तर सेन्सरद्वारे त्याची पूर्वकल्पना थेट डेपो मॅनेजरला मिळते, ज्यामुळे बस रस्त्यात बंद पडण्याचे प्रमाण घटते.

» Selected

## केळी व्यावसायिकाच्या दुकानातून ५० हजार चोरी

**अट्रावल :** अट्रावल येथे केळी व्यावसायिकाच्या दुकानातून ५० हजार रुपये चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी ग्रामपंचायतीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधील फुटेजच्या आधारे संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अट्रावल येथील केळी व्यापारी सुधाकर तायडे यांच्याकडे केळी सप्लायरने ५० हजार रुपये आणून दिले होते. तायडे यांनी ही रक्कम दुकानातील तिजोरीत ठेवली; मात्र घाईगडबडीत तिजोरी लॉक करणे राहून गेले. संशयिताकडे विचारपूस दुकानात उपस्थित असलेल्या एका संशयित तरुणाकडे विचारपूस करण्यात आली असता त्याने चोरी केल्याचे नाकारले. मात्र, घटनेनंतर ग्रामपंचायतीच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये संशयित आरोपी युगेन चौधरी हा स्पष्टपणे दिसून आल्याचे समोर आले.

# जळगावच्या PWD विभागात खळबळ !

## ५ लाखांची लाच स्वीकारताना शाखा अभियंता एसीबीच्या जाळ्यात

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी ।:** जळगाव जिल्ह्यात लाचखोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असतानाच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) सार्वजनिक बांधकाम विभागात (PWD) मोठी धडक कारवाई करत शाखा अभियंत्याला रंगेहाथ पकडले आहे. प्रलंबित बिल मंजूर करून देण्यासाठी १५ लाख रुपयांची लाच मागून तडजोडीअंती ५ लाख रुपये स्वीकारताना योगेश अहिरे यांना एसीबीच्या पथकाने अटक केली. या कारवाईमुळे सार्वजनिक बांधकाम विभागासह शासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. प्रलंबित बिलासाठी मागितली होती १५ लाखांची लाच मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव जिल्ह्यातील एका नोंदणीकृत मक्तेदाराने सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत काम पूर्ण केले होते. संबंधित कामाचे लाखो रुपयांचे बिल मंजूर होणे बाकी होते. बिल




मंजुरीसाठी मक्तेदाराने शाखा अभियंता योगेश अहिरे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी तब्बल १५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. मात्र, मक्तेदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) कडे तक्रार दाखल केली.
एसीबीच्या अधिकाऱ्यांनी अत्यंत गोपनीय पद्धतीने या तक्रारीची पडताळणी केली असता लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले.

एसीबीचा सापळा आणि रंगेहाथ अटक त्यानंतर शनिवारी दुपारच्या सुमारास सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाच्या आवारातच एसीबीने सापळा रचला. ठरलेल्या तडजोडीनुसार पहिल्या हप्त्याचे ५ लाख रुपये स्वीकारताना पथकाने झडप घालत शाखा अभियंता योगेश अहिरे यांना रंगेहाथ पकडले. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून एसीबीकडून पुढील तपास केला जात आहे.

PWD विभाग पुन्हा चर्चेत सार्वजनिक बांधकाम विभाग हा विविध विकासकामांमधील टक्केवारी, कमिशन आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे नेहमीच चर्चेत असतो. अशातच कार्यालयाच्या आवारातच लाखोंची लाच स्वीकारताना वर्ग-२ च्या अधिकाऱ्याला अटक झाल्याने विभागातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. या कारवाईनंतर शासकीय विभागांतील भ्रष्टाचाराविरोधात कठोर पावले उचलण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### एसीबीच्या पथकाने केली अटक

▌ प्रलंबित बिल मंजूर करून देण्यासाठी १५ लाख रुपयांची लाच मागून तडजोडीअंती ५ लाख रुपये स्वीकारताना योगेश अहिरे यांना एसीबीच्या पथकाने अटक केली. या कारवाईमुळे सार्वजनिक बांधकाम विभागासह शासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. प्रलंबित बिलासाठी मागितली होती १५ लाखांची लाच मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव जिल्ह्यातील एका नोंदणीकृत मक्तेदाराने सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत काम पूर्ण केले होते. संबंधित कामाचे लाखो रुपयांचे बिल मंजूर होणे बाकी होते. बिल मंजुरीसाठी मक्तेदाराने शाखा अभियंता योगेश अहिरे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी तब्बल १५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. मात्र, मक्तेदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) कडे तक्रार दाखल केली. एसीबीच्या अधिकाऱ्यांनी अत्यंत गोपनीय पद्धतीने या तक्रारीची पडताळणी केली असता लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

## सर्वज्ञ विद्यालय बोरगावचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

जन सम्राट टाईम्स

**बोरगाव ता. धरणगाव ।** सर्वज्ञ माध्यमिक विद्यालय या विद्यालयाने एस.एस.सी. परीक्षेतील उल्लेखनीय यशाची परंपरा यंदाही कायम राखली आहे. दहावी बोर्डाच्या परीक्षेत विद्यालयाने शंभर टक्के निकालाची नोंद करत ९२.२० टक्के इतकी दमदार गुणवत्ता मिळवली आहे. विद्यार्थ्यांच्या या उज्वल यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर्षी विद्यालयातून एस.एस. सी. परीक्षेसाठी एकूण ६३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते आणि सर्व ६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.
त्यापैकी तब्बल ५१ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य (Distinction) मिळवले, तर ९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत आणि ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. गुणवंत विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय गुण मिळवत शाळेचे नाव उज्वल केले. यामध्ये कु. खुशी ईश्वर मोरे हिने ९२.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. गायत्री योगेश मराठे हिने ९१.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर चि. भावेश विनोद पवार याने ९१ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच चि. मयूर विजय सूर्यवंशी याने ९०.६० टक्के आणि कु. साक्षी कैलास पाटील हिने ९०.२० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. मेहनत, मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य विद्यालयाचे मुख्याध्यापक संदेश महानुभाव यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेकडून विद्यार्थ्यांचे कौतुक विद्यालयाचे चेअरमन मनोज पाटील, संस्थेचे अध्यक्ष, सदस्य तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## पोखरी गावाच्या पाणीप्रश्नाला मोठा दिलासा

### गुलाबराव पाटील व प्रतापराव पाटील यांचे आभार



जन सम्राट टाईम्स


**पोखरी तांडा | प्रतिनिधी:** पोखरी गावाच्या अनेक वर्षांपासूनच्या तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावर अखेर दिलासादायक उपाययोजना करण्यात आली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत कांताई बंधारा परिसरात दोन नवीन बोरवेल करण्यात आले असून, दोन्ही ठिकाणी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या कामासाठी मा. ना. गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कार्यसम्राट प्रतापराव पाटील यांच्या विशेष प्रयत्नांतून ही योजना प्रत्यक्षात साकारण्यात आली. अनेक दिवसांपासून गावातील महिलांना आणि लहान मुलांना पाण्यासाठी दोन ते तीन किलोमीटरपर्यंत पायपीट करावी लागत होती. ऐन उन्हाळ्यात पाण्याच्या एका हंड्यासाठी होणारी ही धावपळ ग्रामस्थांसाठी मोठी डोकेदुखी ठरत होती. कांताई बंधाऱ्यावर यशस्वी बोरवेल जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या या कामात कांताई बंधारा परिसरात दोन ठिकाणी बोरवेल खोदण्यात आले. विशेष म्हणजे, दोन्ही बोरवेलला चांगल्या प्रमाणात पाणी लागल्याने गावाच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार असल्याची आशा व्यक्त होत आहे. “हर घर जल, हर घर नल” या संकल्पनेनुसार आता पोखरी गावातील प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून महिलांनी विशेष समाधान व्यक्त केले आहे.

### ग्रामस्थांकडून आभार व्यक्त

या कामाबद्दल युवा सेना मागासवर्गीय तालुकाप्रमुख नवल पारधी तसेच ग्रामस्थांच्या वतीने ना. गुलाबराव पाटील आणि प्रतापराव पाटील यांचे आभार मानण्यात आले. ग्रामस्थांनी सांगितले की, “गावाच्या पाणीप्रश्नासाठी अनेक वर्षे पाठपुरावा सुरू होता. अखेर लोकप्रतिनिधींच्या पुढाकारामुळे हा प्रश्न मार्गी लागला असून आता गावाला कायमस्वरूपी दिलासा मिळणार आहे.” पोखरी गावातील या कामामुळे ग्रामीण भागातील पाणीटंचाईवर प्रभावी उपाययोजना कशा राबवता येतात, याचे एक सकारात्मक उदाहरण निर्माण झाले आहे.

## विनोद सोळंकी यांना मानद डॉक्टरेट व ‘महात्मा गांधी उत्कृष्टता सेवा पुरस्कार’

जन सम्राट टाईम्स




**पुणे प्रतिनिधी | :** विनोद घिसुलाल सोळंकी या पुण्यातील सामाजिक कार्यकर्त्यांना दिल्ली येथे दोन प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. सामाजिक, आरोग्य, शिक्षण आणि विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना मानद डॉक्टरेट पदवी तसेच महात्मा गांधी उत्कृष्टता सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्टार्टअप शिक्षा फाउंडेशन यांच्या वतीने सामाजिक आणि आरोग्य क्षेत्रातील कार्यासाठी विनोद सोळंकी यांना Honorary Doctorate म्हणजेच सन्माननीय डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आली. तसेच जीवरण फाउंडेशन यांच्या वतीने त्यांना महात्मा गांधी उत्कृष्टता सेवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. विविध क्षेत्रांतील कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल विनोद सोळंकी हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, कला, विज्ञान, आरोग्य, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत. समाजातील विविध घटकांसाठी त्यांनी केलेल्या सेवाभावी उपक्रमांमुळे त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. समाजहिताच्या कामांमधील त्यांची निष्ठा आणि योगदान लक्षात घेऊन राष्ट्रीय स्तरावर हा सन्मान देण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. पुणे शहरातून शुभेच्छांचा वर्षाव दिल्ली येथे झालेल्या सन्मान सोहळ्यानंतर पुणे शहरातून विनोद सोळंकी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विविध सामाजिक संस्था, मित्रपरिवार आणि नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या दुहेरी सन्मानामुळे पुणे शहराच्या सामाजिक क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, समाजसेवेत कार्यरत तरुणांसाठी विनोद सोळंकी प्रेरणास्थान ठरत आहेत.

## ‘भक्ती-शक्ती शौर्य शिबिर’ उत्साहात

। जन सम्राट टाईम्स ।



**जळगाव | प्रतिनिधी :** नशिराबाद येथे “राष्ट्रात निर्मू अवघ्या शिवसूर्य ज्वाळा” या प्रेरणादायी ध्येयमंत्राने भारलेले पाच दिवसीय भव्य ‘भक्ती-शक्ती शौर्य शिबिर’ उत्साहात पार पडले. भक्ती-शक्ती शिवकालीन युद्धकला गुरुकुल यांच्या वतीने आयोजित या निवासी शिबिराचा समारोप ९ मे रोजी झाला. ५ मेपासून सुरू झालेल्या या शिबिरात ६ वर्षांवरील मुला-मुलींसह महिलांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेत शिवकालीन मर्दानी खेळांचा रोमांचक अनुभव घेतला. स्वसंरक्षणासोबत राष्ट्रप्रेमाचे धडे आजच्या धावपळीच्या आणि असुरक्षित वातावरणात स्वसंरक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी प्रशिक्षणार्थींना शिवकालीन युद्धकलेचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. शिबिरात लाठी-काठी, तलवारबाजी, भालाफेक, दंडपट्टा, मल्लखांब आणि रोप मल्लखांब यांसारख्या पारंपरिक युद्धकलांचे प्रशिक्षण देण्यात आले. या कलांमुळे युवकांमध्ये शारीरिक क्षमता, धैर्य आणि आत्मविश्वास वृद्धिंगत झाल्याचे दिसून आले. यासोबतच नियुद्ध, भारतीय पारंपरिक खेळ आणि बौद्धिक वर्गांद्वारे शिस्त, संघभावना आणि राष्ट्रनिष्ठेचे संस्कारही रुजविण्यात आले. शिवकालीन परंपरा आणि भारतीय संस्कृतीची ओळख युवकांना नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न शिबिरातून करण्यात आला. तज्ज्ञ प्रशिक्षकांचे मार्गदर्शन या शिबिरासाठी अनुभवी प्रशिक्षकांची मोठी फळी कार्यरत होती. आशिष गुरुजी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. तसेच प्रशिक्षक म्हणून विनायक भोई, समर्थ गायकवाड, चेतन भोई आणि हर्षल भोई यांनी विशेष मेहनत घेतली. महिला प्रशिक्षणार्थींसाठी दिक्षा गायकवाड, जान्हवी रोटे, मानसी भारंबे, टीना धांडे, ट्विंकल राजपूत आणि शिवानी लोहार यांनी प्रशिक्षण दिले. योगेश पाटील यांचे मोलाचे सहकार्य या उपक्रमाचे सहयोजक म्हणून माजी नगराध्यक्ष योगेश नारायण पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विशेष सहकार्यामुळे हे शिबिर शिस्तबद्ध आणि यशस्वी पद्धतीने पार पडल्याचे आयोजकांनी सांगितले. समारोप प्रसंगी थरारक प्रात्यक्षिके शिबिराच्या समारोपावेळी विद्यार्थ्यांनी शिकलेल्या युद्धकलांचे थरारक प्रात्यक्षिक सादर केले. तलवारबाजीचा वेग, दंडपट्ट्याचे कौशल्य आणि मल्लखांबातील संतुलन पाहून उपस्थित नागरिक भारावून गेले. शिवकालीन गौरवशाली परंपरेचे जतन करत तरुण पिढीला सक्षम आणि स्वाभिमानी बनविण्याचा उद्देश या शिबिरातून यशस्वी झाल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली. या उपक्रमामुळे नशिराबादसह जळगाव परिसरात शिवकालीन युद्धकलेबद्दल नव्याने उत्साह आणि जनजागृती निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## जे. टी. इंग्लिश स्कूलचा दहावीला शंभर टक्के निकाल

**यावल | प्रतिनिधी :** जे. टी. महाजन इंग्लिश School या व्यास शिक्षण मंडळ संचालित विद्यालयाने राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. वैष्णवी युवराज भंगाळे हिने ९०.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. तनुश्री कैलास अहिरे हिने ९० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर कु. योगिनी गणेश जावळे हिने ८९ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक संपादन केला. तसेच कु. निधी पंकज पाटील हिने ८७.४० टक्के आणि कु. प्रांजल श्रीकांत पाटील हिने ८५.६० टक्के गुण मिळवत विशेष प्रावीण्य मिळविले. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शरद जीवराम महाजन, मुख्याध्यापिका रंजना महाजन, दीपाली धांडे, शिक्षकवृंद तसेच पालकांकडून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे

## भाऊसो गुलाबरावजी पाटील माध्यमिक विद्यालयाचा दहावीच्या निकालात ९९ टक्के यश

जन सम्राट टाईम्स



**पाळधी | प्रतिनिधी :** भाऊसो गुलाबरावजी पाटील माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल तब्बल ९९ टक्के लागल्याने संस्थेसह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या परीक्षेत चि. रिद्देश अनिल महाजन याने ८५.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तर कु. वैष्णवी बळीराम सोनवणे हिने ८३.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच कु. सिमरन हनीफ पिंजारी हिने ८३.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक संपादन केला. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा विद्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. डी. कंखरे तसेच शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून कौतुक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शिक्षण प्रसारक संस्था चे प्रेरणास्रोत गुलाबरावजी रघुनाथ पाटील, अध्यक्ष विक्रम गुलाबरावजी पाटील, सचिव प्रतापरावजी गुलाबरावजी पाटील तसेच संस्थेच्या सर्व संचालक मंडळाने विद्यार्थ्यांचे कौतुक करत अभिनंदन केले. विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पाळधी परिसरात समाधान आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## सोनाई इंग्लिश स्कूलचा शंभर टक्के निकाल

### संस्थेची गौरवशाली परंपरा कायम



जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी :** सोनाई इंग्लिश मीडियम हायस्कूल व सायन्स ज्युनिअर कॉलेज या विद्यालयाचा दहावीच्या परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या परीक्षेत चि. सौरव अंकुश चव्हाण याने ९८.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. तर कु. सानिया मनोर बाबू रेड्डी हिने ९५ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच चि. नतिक अनिल पवार याने ९४.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. कठोर परिश्रम आणि शिस्तीचे फळ विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, शिस्तबद्ध अभ्यास आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याचे मत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ए. एल. नरसिंगराव यांनी व्यक्त केले. “विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवत संस्थेची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे. हे यश शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या संयुक्त प्रयत्नांचे फलित आहे,” असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या परीक्षेत चि. सौरव अंकुश चव्हाण याने ९८.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. तर कु. सानिया मनोर बाबू रेड्डी हिने ९५ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच चि. नतिक अनिल पवार याने ९४.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. मान्यवरांची उपस्थिती यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता बनकर, ट्रस्टी स्वर्णा राव, राज लक्ष्मणराव तसेच शिक्षक राम मनोहर रेड्डी, सोनिया मोरे आणि संदेश मोरे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शिक्षकवृंद, पालक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# ऐन उन्हाळ्यातील पाणीटंचाईवर तत्काळ उपाय

## सभापती कीर्तीकांत चौबे यांच्या हस्तक्षेपामुळे धोबीवाडा परिसराचा पाणीपुरवठा सुरळीत

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी ।** नशिराबाद येथील धोबीवाडा आणि सुरभी चौक परिसरात गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेला पाणीपुरवठ्याचा गंभीर प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. मुख्य घरगुती पाणीपुरवठा करणारी पाइपलाइन फुटल्याने सुमारे १० ते १२ कुटुंबांचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. मात्र, पाणीपुरवठा सभापती कीर्तीकांत चौबे यांच्या तत्परतेमुळे हा प्रश्न तातडीने सोडविण्यात आला. सुरभी चौक परिसरातून जाणारी जमिनीखालची पाइपलाइन



अचानक फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत होता. त्याचवेळी अनेक घरांमध्ये पाणी पोहोचत नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली होती. या समस्येची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते महेश सपकाळे यांनी तातडीने प्रशासनाशी संपर्क साधला. त्यांनी पाणीपुरवठा सभापती कीर्तीकांत चौबे यांना परिस्थितीची माहिती देत त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली.

> “नागरिकांची गैरसोय होऊ नये ही आमची प्राथमिकता आहे. तक्रार प्राप्त होताच आम्ही त्वरित दुरुस्तीचे आदेश दिले. शहरातील पाणीपुरवठ्याबाबत कोणतीही समस्या निर्माण झाल्यास तिचे तात्काळ निराकरण करण्यात येईल.
> — **कीर्तीकांत चौबे,** सभापती, पाणीपुरवठा विभाग

### प्रशासनाची युद्धपातळीवर कारवाई

तक्रार मिळताच सभापती कीर्तीकांत चौबे यांनी नगर परिषदेच्या संबंधित विभागाला तत्काळ सूचना दिल्या. त्यानंतर कर्मचारी घटनास्थळी दाखल होत युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. अल्पावधीतच फुटलेली पाइपलाइन दुरुस्त करण्यात आली आणि परिसराचा पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला. या तातडीच्या कार्यवाहीबद्दल परिसरातील नागरिकांनी सभापती कीर्तीकांत चौबे तसेच नगर परिषद प्रशासनाचे आभार मानले आहेत.